माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००३१२३**

**अपिलार्थी श्री. दिनेशसिंग विठ्ठलसिंग शितल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (फ-कार्यासन)**
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, ४ था मजला,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई -४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी**
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, ४ था मजला,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई -४०० ००१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.१०.२०२६**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०१.१०.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.०४.२०२२ | २४.०५.२०२२/०७.०६.२०२२ | १३.०६.२०२२ | १९.०७.२०२२ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २४.०८.२०२२ रोजीच्या अर्जांन्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २४.०५.२०२२, ०७.०६.२०२२ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १९.०७.२०२२ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २७.०४.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(१) "कर्तव्यात कसूर व अधिकाराचा दुरुपयोग करणारे तत्कालिन प्रभारी अधिष्ठाता डॉ. शुभलक्ष्मी जयस्वाल यांची तात्काळ आर्थिक लाभ थांबवलेली किंवा तसा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केलेली प्रत मिळणे.*

*(२) कर्तव्यात कसूर व अधिकाराचा दुरुपयोग करणारे तत्कालिन प्रभारी अधिष्ठाता डॉ. शुभलक्ष्मी जयस्वाल यांना तात्काळ निलंबित केलेली किंवा तसा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केलेली प्रत मिळणे.*

..२/-

*(३) कर्तव्यात कसूर व अधिकाराचा दुरुपयोग करणारे तत्कालिन प्रभारी अधिष्ठाता डॉ. शुभलक्ष्मी जयस्वाल यांची तात्काळ बदली केलेली किंवा तसा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केलेली प्रत मिळणे.*
*(४) कर्तव्यात कसूर व अधिकाराचा दुरुपयोग करणारे तत्कालिन प्रभारी अधिष्ठाता डॉ. शुभलक्ष्मी जयस्वाल यांची तात्काळ शिस्तभंगाची चौकशी करण्यासाठी त्यांच्या वर नियमानुसार दोषारोपपत्र सादर केलेली किंवा तसा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केलेली प्रत मिळणे.*
*(५) कर्तव्यात कसूर व अधिकाराचा दुरुपयोग करणारे तत्कालिन प्रभारी अधिष्ठाता डॉ. शुभलक्ष्मी जयस्वाल यांची तात्काळ शिस्तभंगाची चौकशी करण्यासाठी त्यांची वरिष्ठ कार्यालय किंवा शासन स्तरावर कारवाई होणे कामी प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केलेली प्रत मिळणे.*
*(६) दि. २०.०५.२०२१ व दि. १६.०६.२०२१ रोजी माझे तक्रार अर्ज कोणत्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे पडून होता त्या सर्व अधिकाऱ्यांची नावे व पदनावे मिळणे.*
*(७) आपल्या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी माझ्या वरिल तक्रारी अर्जाच्या ओणि रुग्णालयाचे पत्राच्या प्राप्तीचा व तो निर्गमित केल्याचा पुरावा मिळणे."*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०५.२०२२ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, 'ड' कार्यासन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना कळविले की, श्री. दिनेशसिंग शितल यांनी मा. संभाजी सरकुडे, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्या आदेशाप्रमाणे कर्तव्यावर कसूर करणारे श्री. समाधान जामकर, जन माहिती अधिकारी यांच्या संबंधीत दि. २०.०५.२०२१ व दि.१६.०६.२०२१ रोजीच्या तक्रार अर्जाबाबत विचारणा केलेली आहे. सदरची माहिती ही प्रशासकीय अधिकारी यांच्या आस्थापनेशी संबंधीत असल्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम क्र. ६(३)(i) मधील तरतुदीनुसार सदरचा मुळ अर्ज जन माहिती अधिकारी "ड" कार्यासनाकडे आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी हस्तांतरीत करण्यात येत आहे व त्याची प्रत अपिलार्थींना उपलब्ध करुन दिली.

४. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०६.२०२२ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, 'क' कार्यासन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना कळविले की, अपिलार्थींनी विचारणा केलेली माहिती श्री. समाधान जामकर, प्रशासकीय अधिकारी यांच्याबाबतची माहिती 'ड' कार्यासनाने दि.२७.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये श्री. शितल यांना दिलेली आहे व त्याची प्रत अपिलार्थींना दिलेली आहे.

५. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १३.०६.२०२२ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०७.२०२२ रोजी डॉ. शुभलक्ष्मी जयस्वालय, प्रभारी, अधिष्ठाता, डॉ. वै. स्मृ. शा. वै. म. सोलापूर यांनी मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे, यांचे दि. ११.०२.२०१९ च्या आदेशान्वये श्री. समाधान जामकर यांच्याबाबत केलेल्या कार्यवाहीच्या प्रती देण्याचे ठरले. सदर माहिती अपिलकर्ता यांना १५ दिवसांत देण्याबाबत अपिलीय अधिकारी यांनी आदेश देवून प्रथम अपिल निकाली काढलेले आहे.

..३/-

६. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सुनावणी नोटीस प्राप्त असुनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर अपिलार्थींना पुन्हा कळविण्यात आले होते की, श्री. समाधान जामकर यांच्याकडून दि. ३०.०५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिकार अर्जान्वये शास्तीची रक्कम रु. २५०००/- वसूल करण्यात आली व सदर पावतीची प्रत अपिलार्थींना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

७. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०९.१०.२०२६**

State Information Commission Greater Mumbai

9-10-2026
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ